महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

पत्र क्र./पुविमं/खा.वि./ 5629
पुणे-४११००५
दि. १४/०९/२०२३

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त विद्यालय,
व कनिष्ठ महाविद्यालय,
पुणे/अहमदनगर/सोलापूर.

विषय: फेब्रु-मार्च २०२४ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेसाठी खजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.
संदर्भ: राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/४१०७ दि. १३/०९/२०२३.

उपरोक्त विषयाबाबत राज्यमंडळाच्या संदर्भिय पत्रासोबतच्या प्रकटनानुसार फेब्रु-मार्च २०२४ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने नियमित शुल्काने स्विकारण्याचा कालावधी इ. १० वी साठी दि. १४ ऑगस्ट २०२३ ते ११ सप्टेंबर २०२३ व इ. १२ वी साठी दि. १० ऑगस्ट २०२३ ते दि. ११ सप्टेंबर २०२३ पर्यंत निश्चित करण्यात आला होता. जे विद्यार्थी उपरोक्त मुदतीत नाव नोंदणी करू शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यासाठी दि. २०/०९/२०२३ ते दि. ३०/०९/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर सूचना सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च -२०२४ करिता खाजगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज विद्यार्थ्यांकडून जमा करून घेण्यास काही शाळांकडून अडवणूक करण्यात येते, शाळेची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय सदर शाळा का निवडली ? शाळेत नोंदणी अर्ज जमा करण्यास गेले असता विद्यार्थ्यांना व पालकांना योग्य वागणूक मिळत नाही इ. तक्रारी विभागीय मंडळास प्राप्त झाल्या आहेत.

त्यामुळे आपण विद्यार्थ्यांना योग्य ते सहकार्य न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस आपणास जबाबदार ठरविण्यात येईल व आपल्या शाळेवर मंडळाच्या नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सोबत: उपरोक्त संदर्भिय पत्र.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स. नं. ८३२-ए, फायनल प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.मं./परीक्षा-३/ 8106
पुणे – ४११००४
दिनांक – १३/०९/२०२३

प्रति,

१ मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
२ मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण.
३ मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई – ४०००३०.
४ मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नविन प्रसारण भवन, वाकवे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई – ४०००२०.
५ मा. संचालक, आकाशवाणी केंद्र,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६ सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी.
७ मा. संपादक, सर्व वृत्तवाहिनी व वृत्तपत्र.

विषय :– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रु–मार्च २०२४ च्या परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.

महोदय,

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु–मार्च २०२४ परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे भरण्यासाठी मुदतवाढ देणेबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यक्षेत्रातील वृत्तपत्रांनी त्यांच्या वृत्तपत्रात, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे–०४.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :–

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ, यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांच्या/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे
३) अस्वीस, सस्वीस, राज्य मंडळ, पुणे
४) ऑनलाईन विभाग
५) लेखा विभाग

प्रत माहितीसाठी सविनय सादर :–

१) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई–४०००३२
२) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे–४११००१

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.

## प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी फॉर्म नं. १७ भरून परीक्षेस प्रविष्ठ होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

फेब्रु–मार्च २०२४ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने नियमित शुल्काने स्विकारण्याचा कालावधी इ. १०वी साठी दि. १४ ऑगस्ट २०२३ ते दि. ११ सप्टेंबर २०२३ व इ. १२वी साठी दि. १० ऑगस्ट २०२३ ते दि. ११ सप्टेंबर २०२३ पर्यंत निश्चित करण्यात आला होता.

जे विद्यार्थी उपरोक्त मुदतीत नावनोंदणी करु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

**इ. १० वी व इ. १२वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यासाठी मुदतवाढ**

| अ.क्र. | तपशील | इ. १०वी व इ. १२वी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे | बुधवार दि. २०/०९/२०२३ ते शनिवार दि. ३०/०९/२०२३ |
| २ | विद्यार्थ्यांनी मुळ अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे | शुक्रवार दि. २२/०९/२०२३ ते मंगळवार दि. ०३/१०/२०२३ |
| ३ | माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावती एक छायाप्रत मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. | गुरुवार दि. ०५/१०/२०२३ |

१. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १०वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील संकेतस्थळाचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी –

**संकेतस्थळ:–** इ.१०वी – http://form17.mh-ssc.ac.in

इ.१२वी – http://form17.mh-hsc.ac.in

३. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मुळ प्रत), नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञा पत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

४. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य (Compulsory) आहे.

५. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला अर्जात नमूद केलेल्या ई–मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट,शुल्क पावती व हमीपत्र यासह २ प्रतीत काढून घ्यावी.

६. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नाव नोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहीत मुदतीत जमा करावयाची आहे.

७ खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे –

इ. १०वी – रु १०००/– नोंदणी शुल्क + रु १००/– प्रक्रिया शुल्क (Processing Fee)

इ. १२वी – रु ६००/– नोंदणी शुल्क + रु १००/– प्रक्रिया शुल्क (Processing Fee)

८ अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र(इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यमनिहाय माध्यमिक शाळांची यादी दिसेल, त्यापैकी विद्यार्थ्यांची पूर्वीची शाळा किंवा पत्त्यानुसार सर्वात जवळची शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज व अंतर्गत मूल्यमापन करावयाचे आहे. याबाबत सर्व माध्यमिक शाळांना विभागीय मंडळांनी मार्गदर्शन करावे. या वर्षा पासून संपर्क केंद्र पध्दत बंद करण्यात आली असल्याने मान्यताप्राप्त सर्व शाळांमधून खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज स्विकारणे अनिवार्य आहे, याची सर्व मान्यता प्राप्त शाळांनी नोंद घ्यावी व उचित कार्यवाही करावी.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांना पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील विद्यार्थ्यांची पूर्वीची शाळा/कनिष्ठ महाविद्यालय किंवा पत्त्यानुसार सर्वात जवळची शाळेची शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाद्वारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी परीक्षा द्यावयाची आहे. याबाबत सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय मंडळांनी मार्गदर्शन करावे.

९. इ.१०वी व इ.१२वी फेब्रु–मार्च २०२४ खाजगी विद्यार्थी फॉर्म नं १७ नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPI/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोच पावती स्वत:कडे ठेवून त्याच्या दोन छायाप्रती माध्यमिक शाळेस/कनिष्ठ महाविद्यालयास देण्यात याव्यात. तसेच एकदा नावनोंदणी अर्ज सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नावनोंदणी शुल्क विद्यार्थ्याला परत केले जाणार नाही. तसेच नाव नोंदणी अर्जात दुरुस्ती करावयाची (उदा. माध्यम, शाखा, माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय अथवा अन्य कारणास्तव) असल्यास विद्यार्थ्यास पुन:श्च नावनोंदणी शुल्क ऑनलाईन जमा करावे लागेल याची नोंद घ्यावी.

१० दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ठ व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकीत्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ/माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी.

११ ऑनलाईन अर्ज भरतांना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक ०२०–२५७०५२०७/२५७०५२०८/२५७०५२७१ वर संपर्क साधावा.

१२ विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र (Eligibility Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी.

१३ पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Application Form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१४ खाजगी विद्यार्थी नियमित शुल्काने नावनोंदणी करण्याकरिता अंतिम मुदत ही शनिवार दि. ३०/०९/२०२३ पर्यंत असणार आहे, यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घेवून उचित कार्यवाही करावी.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ०४.

दिनांक – १३/०९/२०२३